सकाळ दि 19/06/2023

# जबरी चोरी करणाऱ्यांकडून चार गुन्हे उघड

## स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत दोन लाख ७३ हजार मुद्देमाल जप्त



**नांदेड:** भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोबाईल चोरट्यांना पकडून त्यांच्याकडून चोरलेले २० मोबाईल जप्त केले आहेत.

**नांदेड, ता.१८ :** जिल्ह्यामध्ये गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता या गुन्हेगारांना अटक करून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जबरी चोरी करणाऱ्या टोळाली अटक करून त्यांच्याकडून चार गुन्हे उघड केले आहे. त्यांच्याकडून दोन लाख ७३ हजार रुपये किंमतीचे २० मोबाईल जप्त केले आहे.

भाग्यनगर आणि विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल हिसकावण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने व त्यांचे पथक रविवारी (ता.१८) शोध घेतला असताना भाग्यनगर भागात गेले होते. तेथे दोन इसम मोर चौकात जुने मोबाईल विक्री करण्यासाठी विचारणा करत होते. त्यावरून सदर पथकाने कमलेश सुरेश वाघमारे (वय २३, रा. वाडीरोड एकतानगर नांदेड) आणि कपिल अशोक कदम (वय २६, रा. वाडीरोड एकता नगर नांदेड) यांना पकडून विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी त्यांच्या जवळील चोरलेले २० मोबाईल काढून दिले. त्यात दोन मोबाईल हे भाग्यनगर तर दोन मोबाईल विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने, माधव केंद्रे, पोलिस उपनिरीक्षक शाहू, गंगाधर कदम, गुंडेराव करले, मारोती मोरे, तानाजी येळगे, महेश बडगु, गंगाधर घुगे यांनी केली.

# जबरी चोरी करणाऱ्या टोळीस अटक

## वजिराबाद पोलिसांची कामगिरी : खंजरचा धाक दाखवून लुटमार

▶ **सकाळ वृत्तसेवा**

नांदेड, ता.१८ : शहर व जिल्ह्यात दररोजच जबरी चोरीच्या घटना घडच असून, त्यावर आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व पोलिस ठाण्यांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वजीराबाद पोलिसांनी रविवारी (ता.१८) जबरी चोरी करणाऱ्या परराज्यातील टोळीस अटक केली आहे.

अधिक माहिती अशी की, राहुल साहेबराव मेढकर (रा. चिखलवाडी) हे ता.१६ जून रोजी रात्री अकरा वाजताच्या सुमारास मित्राला भेटून घराकडे जात होते. यावेळी हिंगोली गेट पुलाच्या खाली चार आरोपींनी त्यांना खंजरचा धाक दाखवून रोख एक हजार रुपये व १४ हजार ५०० रुपयांचा मोबाईल जबरीने हिसकावून नेला होता. वजीराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक राम केंद्र या घटनेचा तपास करत आहे.

गोपनीय माहिती मिळाल्यानंतर वजिराबाद पोलिस ठाण्याचे पथक हिंगोली गेट येथे गेले असता, आरोपी पथकाला बघून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. सदर पथकाने या आरोपींना अटक करून विचारणा केली असता, त्यांनी गुरुप्रितसिंघ धर्मसिंघ मजबीशिख (रा. मानाळा, जि.अमृतसर), जगजीतसिंघ सतनामसिंघ मजबीशिख (रा. चुंग, जि. तरणतारण), करणदीपसिंघ बलकारसिंघ मजबीशिख (रा. बावकाळा, जि.अमृतसर), मलकीतसिंघ लखविंदरसिंघ मजबीशि[...] (रा. तारणतारण) असे सांगितले. सर्वांवर जबरी चोरीचा गुन्हा दा[...] करण्यात आला आहे. सदर गुन्[...] तपास पोलिस उपनिरीक्षक जयश्री[...] करत असून, त्यांच्याकडून एक [...] व चोरील गेलेला मोबाईल जप्त क[...] आला आहे.

सदरची कारवाई वजिराबाद ठाण्याचे पोलिस निरीक्षक [...] भंडरवार यांच्या मार्गदर्श[...] सहायक पोलिस निरीक्षक [...] जमदडे, मनोज परदेशी, भ[...] राठोड, बालाजी कदम, शेख [...] एजाज, गुरुद्वारा सुरक्षा पथका[...] अमलदार प्रभाकर कांबळे, [...] यांनी केली आहे.